# प्रेस नोट

दि. १४/०२/२०१९

देवगड पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ०७/२०१९ हा गुन्हा दि. १५/०१/२०१९ रोजी दाखल होता. सदर गुन्हयात आरोपीत महिला हिने दुकानातील चार्जींगसाठी लावलेला मोबाईल चोरुन नेल्याबाबत सी.सी.टी.व्ही कॅमेरा फुटेज मध्ये दिसत होते. सदर महिलेचा तात्काळ शोध घेण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक, श्री. दिक्षीत गेडाम व अपर पोलीस अधीक्षक, श्री. निमीत गोयल यांनी सुचना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागास देण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे आज दि. १४/०२/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक, श्री. प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, शाहु देसाई, पोहेकॉ/ कोयंडे, पोना/खंडे, पोकॉ/गावडे सोबत महिला पोलीस सावंत यांचे पथकाने सी.सी.टी.व्ही कॅमेरा फुटेज मधील महिलेच्या वर्णनावुरुन गोपनीय बातमीदारांमार्फत शोध घेवुन सदरच्या महिलेस मौजे कासार्डे ता.कणकवली येथुन ताब्यात घेवुन तिचे ताब्यातुन चोरीस गेलेला १६,०००/- रु. किंमतीचा मोटोरोला कंपनीचा मोबाईल जप्त करुन पुढील कारवाईकरीता देवगड पोलीस ठाणेत हजर करण्यात आलेले आहे.

धन्यवाद.

दिक्षीतकुमार गेडाम
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग.